ePaper

## "नाव व चिन्ह मिळवण्यासाठी 2000 कोटींचा सौदा" : संजय राऊत



| वर्ष - 6 | अंक - 305 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- भाजपाला जनाची नाही तर मनाची लाज वाटली पाहिजे
- लक्ष्मण जगताप चिंचवडचे विकासपुरुष!
- "मुख्यमंत्री पदासाठी उद्धव ठाकरेंनी काँग्रेस राष्ट्रवादीचे तळवे चाटले"


www.mahaenews.com | सोमवार, दि. 20 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अश्विनी जगतापांना विजयी करा:पंकजा मुंडे

## लक्ष्मण जगताप यांच्या विकासकामांवर चिंचवडकरांनी प्रेम व्यक्त करावे

**। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।**

**दिवंगत लक्ष्मण जगताप यांनी शहरातील प्रश्नांसाठी आमदारकीचा राजीनामा दिला होता. त्यानंतर ते भाजपमध्ये आले आणि राज्यात भाजप-शिवसेना युतीची सत्ता आली. युतीची सत्ता आल्यानंतर पिंपरी-चिंचवडचे सर्व प्रश्न सोडवण्यात आले. आताच्या सरकारने शास्तीकराचा प्रश्नही कायमचा सोडवला आहे. चिंचवडच्या जनतेने अश्विनी लक्ष्मण जगताप यांना साथ देऊन दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या राजकीय कारकिर्दीवर आणि त्यांनी केलेल्या विकासकामांवर प्रेम व्यक्त करावे, असे आवाहन भाजपच्या नेत्या व माजी मंत्री पंकजा मुंडे यांनी रविवारी केले.**




चिंचवड पोटनिवडणुकीतील भाजप-शिवेसना व मित्र पक्षाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारार्थ रहाटणीतील विमल गार्डनमध्ये सभा झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी अश्विनी लक्ष्मण जगताप, खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, भाजपचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, रिपब्लिकन पार्टी आठवले गटाचे शहराध्यक्ष स्वप्निल कांबळे, राज्याच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, राष्ट्रीय समाज पक्षाचे शहराध्यक्ष भारत महानवर यांच्यासह भाजप, शिवसेना, रयत क्रांती संघटना, शिवसंग्राम संघटना आणि प्रहार संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पंकजा म्हणाल्या की, आज मी दिवंगत लक्ष्मण जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी येथे आले आहे. त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या पाठीशी एक बहीण म्हणून उभे राहण्यासाठी मी आले आहे.

माझा बाप अचानक गेल्यानंतर मला जनसेवेसाठी वाघीण व्हावे लागले. अश्विनी जगताप या सुद्धा वाघीणच आहेत. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी अनेक वर्षे सेवा केली. लक्ष्मणभाऊंनी शून्यातून विश्व निर्माण केले. पिंपरी-चिंचवडचा विकास करताना लक्ष्मण जगताप लढले. ते अपक्ष आमदार असताना काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार होते. आमदारकीची राजीनामा देऊन ते भाजपमध्ये आले.

भाजपचे सरकार आल्यानंतर त्यांनी शहरातील प्रलंबित आणि किचकट प्रश्न सोडवले. या राज्यात सामान्यांची चिंता करणारी सत्ता प्रस्थापित झाली आहे. सत्तेबाहेर असतानाही येथील जनतेने दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्यावर प्रेम केले. त्यांचे शहराच्या विकासाचे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना साथ देऊन त्यांच्या कारकिर्दीवर प्रेम व्यक्त करा, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर त्यांच्या घरी शोक व्यक्त करण्यासाठी आलेल्या नेत्यांनी त्यांच्या कामाचा आणि त्यांनी केलेल्या विकासाचा गौरव केला होता. पण नंतर या नेत्यांनी वेगळी भूमिका घेतली याचे आपणास दुःख वाटतेय.

> "दिवंगत गोपीनाथ मुंडे खासदार झाले आणि केंद्रात मंत्री झाले. त्यानंतर सहाव्या दिवशीच त्यांचा मृत्यू झाला. या धक्क्यातून आमच्या कुटुंबांसह त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लाखो लोकांना सावरता आले नाही. गेलेल्या माणसाची जबाबादारी सांभाळताना काय कसरत करावी लागते याची मला जाणीव आहे. आज दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांनाही तशीच कसरत करताना मी पाहिले आहे. पती आपल्यामध्ये नाही हे दुःख बाजूला ठेवून संयम आणि जबाबदारीने त्या वागत आहेत. लोकांसमोर बोलत आहेत. एक स्त्री म्हणून मला त्यांचा अभिमान वाटतो.
>
> **- पंकजा मुंडे, भाजप नेत्या**

> या पोटनिवडणुकीत अश्विनी लक्ष्मण जगताप निश्चितपणे विजयी होणार आहेत. एखाद्याच्या घरात निधन झाल्यानंतर सांत्वन करायला जाण्याची आपली संस्कृती आहे. पण काही नेते लक्ष्मण जगताप यांच्या निधनाच्या दुःखामध्ये मीठ चोळण्याचे काम करत आहेत. स्वतःला मोठे नेते म्हणवणाऱ्यांनी माणुसकीचा धर्म सोडला आहे. विरोधी पक्षातील नेत्यांनी दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना बिनविरोध निवडून द्यायला हवे होते. पण त्यांच्या डोक्यात केवळ राजकारण आहे. त्यामुळे ही जनता विरोधकांना थारा देणार नाही. अनधिकृत बांधकामांबाबत केलेल्या आंदोलनाच्या आजही आमच्यावर केसेस आहेत. हा प्रश्न सोडवल्याचे कोणी कितीही वल्गना करत असले तरी भाजप-शिवसेनेनेच हा प्रश्न मार्गी लावलाय हेच सत्य आहे. पोटनिवडणुकीत विकासात्मक काम केलेल्या दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या कामावरच मतदान करा
>
> **-श्रीरंग बारणे, खासदार, मावळ लोकसभा**

# महापालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी

## शिवाजी महाराजांचे चरित्र सर्वांनी वाचन केले पाहिजे, शेखर सिंह यांचे प्रतिपादन

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**छत्रपती शिवाजी महाराज हे कुशल प्रशासक, युद्धनीती, राजनिती निपुण असे जगातील आदर्श लोककल्याणकारी राजे होते, शिवाजी महाराजांचे चरित्र सर्वांनी वाचन केले पाहिजे, त्यांच्या व्यापक विचारांचा वारसा सर्वांनी जोपासावा असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध ठिकाणच्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास आज पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादनाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी सर्वाना शिवजयंती निमित्त शुभेच्छा देताना आयुक्त शेखर सिंह बोलत होते. मुख्य प्रशासकीय कार्यालयातील



कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, उप आयुक्त रविकिरण घोडके, क्षेत्रीय अधिकारी विजयकुमार थोरात, जनसंपर्क विभागाचे प्रमुख पुराणिक, वाहनचालक संघटनेचे राजेश जाधव आदी उपस्थित होते. यानंतर आयुक्त शेखर सिंह यांनी पिंपरी तेथील हिंदुस्थान अँटीबायोटीक्स कंपनीच्या आवारातील तसेच भक्ती-शक्ती चौक निगडी, डांगे चौक, लांडेवाडी भोसरी या ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# भाजपाला जनाची नाही तर मनाची लाज वाटली पाहिजे

## गिरीश बापटांना प्रचारासाठी आणल्याने अजित पवारांचा संताप

।पुणे । महाईन्यूज ।

**भाजपा निवडणूका आल्या की कुठल्याही स्थराला जाऊ शकते. आयसीयूमध्ये असलेल्या नेत्यांना स्टेजवर आणून बसवतात. गिरीश बापट हे आयसीयूमध्ये असताना त्यांना ऑक्सिजन च्या नळ्या घालून प्रचारासाठी आणले, भाजपाला जनाची नाही तर मनाची लाज वाटायला पाहिजे. माणूस सिरीयस आहे आणि यांना राजकारणाचे पडले आहे. असे अजित पवार यांनी भाजपाला ठणकावले आहे. ते पिंपरी- चिंचवड शहरातील पिंपळे निळख येथे नाना काटे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते.**



अजित पवार यांनी नाना काटेंच्या प्रचार सभेत चौफेर फटकेबाजी करत भाजपावर सडकून टीका केली. ते म्हणाले की, भाजपा निवडणुका आल्या की कुठल्याही स्थराला जाते. निवडणुका आल्या की आयसीयूमधील नेत्यांना ते स्टेजवर आणून बसवतात. गिरीश बापट हे आयसीयूमध्ये होते. ऑक्सिजन च्या नळ्या घालून त्यांना प्रचार करायला लावला. जणाची नाही मनाची लाज वाटली पाहिजे. असे म्हणत अजित पवार यांनी भाजपाला ठणकावले. पुढे ते म्हणाले की, माणूस सिरीयस आहे आणि यांना राजकारणाचे पडले. यांच्यात धमक नाही?, अनेक वर्षे भाजपाचे ज्यांनी काम केले. त्यांच्याबाबतीत खालच्या स्थराला जाऊ शकतात. हे मतदारांनी पाहिले आहे. दिवंगत लक्ष्मण जगताप यांना रुग्णालयात असताना महत्वाचं इंजेक्शन परदेशातून आणून दिले. त्यांना कस वाचवता येईल यासाठी प्रयत्न केला. माणसे जोडायची असतात तोडायची नसतात. हे भाजपा वाल्यानी लक्षात ठेवले पाहिजे. भाजपा लोकांना वापरून घेतात. दिवंगत मुक्ता टिळक, लक्ष्मण जगताप यांना राज्यसभा आणि विधानपरिषदे च्या निवडणुकीत स्वतःच्या फायदयासाठी रुग्णवाहिका करून घेऊन गेलात. एक- दोन मते मिळाली नसती तर असे काय आकाश पाताळ एक झाले असते का?, स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याच्या जीवाची पर्वा न करिता भाजपा ला या निवडणुकीत त्यांची जागा दाखवून द्या असे आवाहन अजित पवारांनी जनतेला केले आहे.पुढे ते म्हणाले की, महागाई बेरोजगारीवर सत्ताधारी समाधानकारक उत्तर देत नाहीत. कशा प्रकारे राज्यातील सरकार आले ते आपण जून मध्ये पाहिले. राज्यात तोडफोडी चे राजकारण चालले आहे. वैचारिक भूमिका बाजूला ठेवली जात आहे. नागरिकांच्या प्रश्नावर दुर्लक्ष केले जात आहे. पुढे ते म्हणाले की, हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शिवसेना पोहचवली. द्विभाषिक राज्य असल्याने मुंबईत मराठी माणसाला आधार मिळत नव्हता. मराठी माणसाला आधार देण्यासाठी शिवसेना स्थापन केली. प्रबोधनकार ठाकरे यांनी शिवसेना हे नाव दिले. हा इतिहास आहे. बाळासाहेब यांनी पानटपरी, रिक्षा चालक यांना आमदार, खासदार, मुख्यमंत्री करण्याचे काम केले. ज्यांच्या वडिलांनी शिवसेना स्थापन केली. शिवाजी पार्क च्या सभेत सांगितले की माझे वय झाले आहे शिवसेना प्रमुख म्हणून उद्धव ठाकरे आणि युवा प्रमुख म्हणून आदित्य ठाकरे हे जबाबदारी सांभाळतील. असे शिवाजी पार्क च्या साक्षीने उभ्या महाराष्ट्राला बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले. पण, ज्यांना शिवसेनेने मोठे केले ते बाहेर पडले. महापुरुषांनी आपल्याला अशी शिकवण दिली नाही. स्वतः च्या स्वार्थासाठी किती टोकाची भूमिका घेणार? असा सवाल ही अजित पवारांनी उपस्थित केला.

# लंडनच्या संसद चौकात 'जय शिवराय'चा नारा

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात लंडनच्या संसद चौकात साजरी करण्यात आली. लंडन येथे शिक्षणासाठी गेलेल्या संग्राम शेवाळे यांनी भारतीय विद्यार्थी, मित्र आणि देशातील विद्यार्थ्यांसोबत शिवजयंती साजरी केली. या वेळी जय शिवरायच्या अशा घोषणांनी संसद भवन परिसर दणाणून सोडला.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य संपूर्ण जगात परिचित आहे. आपल्या युद्ध कला आणि सर्वसमावेशक प्रशासकीय नैपुण्यांमुळे शिवाजी महाराज आदर्श राजे ठरले. लंडन शहरात आपली भारतीय संस्कृती जोपासत भारतातील अनेक राज्यातील विद्यार्थी यावेळी अँड.संग्राम शेवाळे यांच्या पुढाकाराखाली शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यासाठी एकत्रित आले होते. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले.

या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी अनेक देशातील अभ्यासक भारतात येतात आणि हीच महाराष्ट्राची परंपरा आम्ही जोपासत शिवाजी महाराज यांना लंडन संसद चौकात वंदन केले, अशी माहिती अँड. संग्राम शेवाळे यांनी दिली.



# "स्वराज्याचा अर्थ फक्त शासन बदलणे नाही, तर आपल्या धर्मानुसार सरकार चालणे"

## केंद्रीय गृहमंत्रीअमित शाह यांचे प्रतिपादन

। आंबेगाव । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ नाव नाही तर विचार आहे. शिवाजी महाराज यांनी सुरू केलेला स्वराज्य संघर्ष अजूनही सुरू आहे. स्वराज्याचा अर्थ फक्त शासन बदलणे नाही तर आपल्या धर्मानुसार सरकार चालणे असा आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी येथे केले.**

मंदिर पुनर्निर्मितीचे काम शिवाजी महाराजांनी केले होते. या प्रकारचे काम आता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. राममंदिर, काशी विश्वनाथ, सोमनाथ मंदिर ही त्याची उदाहरणे आहेत, असेही त्यांनी सांगितले.पद्मविभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या संकल्पनेतून आणि महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान तर्फे नऱ्हे – आंबेगाव येथे साकारत असलेल्या 'शिवसृष्टी' प्रकल्पाअंतर्गत सरकारवाड्याचे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे पर्यटनमंत्री मंगलप्रसाद लोढा, आमदार, श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नाना जाधव, प्रांत कार्यवाहक प्रवीण दबडघाव, महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे विश्वस्त जगदीश कदम, विनीत कुबेर यावेळी उपस्थित होते.

स्वधर्म, स्वराज्य, स्वभाषा हा शिवाजी महाराजांचा विचार नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे काम या शिवसृष्टीद्वारे होईल. ही शिवसृष्टी आशियातील सर्वात मोठा 'थीम पार्क' ठरणार आहे. शिवसृष्टीचे काम ठरलेल्या वेळेत पूर्ण होईल, असे अमित शाह यांनी सांगितले.

शाह म्हणाले, बाबासाहेब पुरंदरे यांनी शिवाजी महाराज लोकांपर्यंत पोहोचवले. बाबासाहेब पुरंदरे यांनी शिवाजी महाराज यांचा



विचार देशभर पोहोचवला. 'जाणता राजा' या महानाट्याच्या माध्यमातून त्यांनी मोठ कार्य केले. शिवाजी महाराज यांच्या विचारासाठी पुरंदरे यांनी जगभरातून संदर्भ जमा केले. शिवरायांसाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांनी शिवरायांचा विचार सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत पोहोचवला. पुरंदरे यांनी हे काम केले नसते, तर शिवाजी महाराज यांची ओळख मोठ्या प्रमाणात देशभर पोहोचली नसती, पुरंदरे यांचे स्वप्न आज सत्यात उतरत आहे, याचा आनंद आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसृष्टीच्या कामासाठी सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

# लक्ष्मण जगताप चिंचवडचे विकासपुरुष!

## सर्वात तरूण खासदार तेजस्वी सूर्यांचा युवकांशी संवाद



दिवंगत लक्ष्मण जगताप यांनी काय विकासकामे केली आहेत हे आपण जनता पाहतच आहोत. त्यांनी मतदारसंघात विकासात्मक काम केले आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जे काम झाले, तेच काम दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली येथे झाले आहे. ते भाजपचे कर्मट कार्यकर्ते होते. विकासपुरूष व लोकप्रिय लोकनेते होते. शहरातील प्रत्येक विकासात त्यांची छाप आहे. कार्यकर्ता कसा असावा याचा आदर्श त्यांनी निर्माण केला. त्यांच्या एका मतामुळेच राज्यात परत भाजपची सत्ता आली. त्यांची विकासाची आणि कर्मट कार्यकर्त्याची परंपरा पुढे नेण्याची संधी पोटनिवडणुकीत प्राप्त झाली आहे. त्यांचे ऋण परत देण्याची संधी आपल्यासमोर आहे. पोटनिवडणुकीत भाजपचाच विजय निश्चित आहे. हा विजय ऐतिहासिक आणि अभूतपूर्व होण्यासाठी भाजपच्या कार्यकर्त्यांनी घरघरापर्यंत जाऊन, मतदारांशी थेट संपर्क करावे. त्यांना मतदान केंद्रापर्यंत आणून मतदान करून घ्यावे. मतदारांनी घराबाहेर पडून एक मत चिंचवडच्या विकासासाठी द्यावे.

- तेजस्वी सूर्या, खासदार

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जसा विकास होत आहे, तसाच विकास दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवडमध्ये झाला. लक्ष्मण जगताप हे कर्मट कार्यकर्ते आणि विकासपुरूष होते. जनतेला भाजपच विकास देऊ शकतो हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे पोटनिवडणुकीत एक मत चिंचवडच्या विकासाची परंपरा पुढे सुरू ठेवण्यासाठी द्या, असे आवाहन भाजप युवा मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष व सर्वात तरूण खासदार तेजस्वी सूर्या यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यां. रहाटणीतील कापसे लॉन्समध्ये भाजप युवा मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष व युवा खासदार तेजस्वी सूर्या यांनी “व्हिजन न्यू इंडिया” या विषयावर युवकांशी संवाद साधला.

यावेळी चिंचवड पोटनिवडणुकीतील भाजप-शिवसेना व मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप, भाजपचे शहराध्यक्ष व आमदार लक्ष्मण जगताप, भाजयुमोचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व आमदार राम सातपुते, भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष संकेत चोंधे, प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार यांच्यासह भाजपचे सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी व युवक उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे, भाजपचे प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर आणि भाजयुमोचे शहराध्यक्ष संकेत चोंधे यांनीही मार्गदर्शन केले.

### देशाची आर्थिक विकासाकडे वाटचाल

देशातील जनतेच्या एका मतामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अहिल्याबाई होळकर यांच्यानंतर संपूर्ण देशात सांस्कृतिक पुनरुत्थानाचे काम सुरू आहे. नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान झाल्यानंतर नव्या भारताचा उदय झाला. विकासकामांना गती आली आहे. देशाची आर्थिक विकासाकडे वाटचाल झाली आहे. देशभर रस्ते कामांची मोठ्या प्रमाणात निर्मिती होत आहे. देशाच्या सीमा सुरक्षित करणारे काम होत आहे. फक्त आठच वर्षांत संपूर्ण देश कन्स्ट्रक्शनसारखे दिसते. सगळीकडे नवीन काही तरी उभे केले जात आहे.राहुल गांधी ज्या रस्त्यांवरून फिरून भारत जोडो यात्रा करत होते, ते मोदी यांनी तयार केले होते. भाजप विकासाच्या माध्यमातून देश बांधणारा पक्ष असून, काँग्रेस विकास नष्ट करणारा पक्ष आहे. भाजपच या देशाला विकास देऊ शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.”

---

## शिवरायांच्या संकल्पनेतील रयतेचे राज्य आणण्यासाठी

# जातीयवादी भाजपला हद्दपार करा...

## चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक : शिवजयंतीनिमित्त नाना काटे यांचे चिंचवडकरांना आवाहन

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवरायांनी स्थापलेल्या महाराष्ट्रात सध्या जातीयवादी राज्यकर्त्यांनी मनामनात द्वेष पेरला आहे. संतांच्या, महापुरुषांच्या विचारधारेतील आणि खुद्द स्वराज्यनिर्माणकर्त्या छत्रपती शिवरायांच्या मनातील रयतेचं राज्य आणण्यासाठी, त्यांच्या संकल्पनेतील लोकशाही आणण्यासाठी जातीयवादी शक्तींचा बिमोड करण्याची वेळ आली आहे. त्यामुळेच पिंपरी-चिंचवड शहरातील बोकाळलेला भ्रष्टाचार संपविण्यासाठी भाजपला हद्दपार करा, असे आवाहन चिंचवडचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी नागरिकांना केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त नाना काटे यांनी ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. त्यावेळी नागरिकांशी त्यांनी संवाद साधला. ते म्हणाले की, ‘छत्रपती शिवरायांनी आदर्श राज्याची संकल्पना मंडळी आणि यशस्वीही करून दाखवली. छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या उत्कृष्ट प्रशासनात समाजातील बारा बलुतेदारांना मानाचं स्थान होतं. त्यांनी कधीही जाती-धर्माचा भेदभाव केला नाही. मात्र त्यांनी आखून दिलेल्या मार्गावर चालताना सर्वच स्तरावरील लोकांना सोबत घेऊन जायचं आहे.’

पुढे नाना काटे म्हणाले की, सध्या भारतीय जनता पक्षाकडून सर्वत्र जातीय द्वेष, भेदभाव, तणाव निर्माण करण्यात येत आहे. अशावेळी नागरिकांनीच सजगतेने पुरोगामी विचारसरणीच्या उमेदवारांना निवडून आणायचे आहे. त्यामुळे समाजाच्या सर्वच घटकांना सोबत घेतलेल्या महाविकास आघाडीलाच मतं द्या’, असे आवाहन नाना काटे यांनी केले. शिवरायांच्या विचारधारेवर चालत मतदारसंघातील समस्या त्वरित सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.



### विविध संघटनांचा नाना काटेंना पाठिंबा

आरपीआयचे महाराष्ट्र संघटक कैलास जोगदंड यांनी नाना काटे यांची भेट घेऊन त्यांना जाहीर पाठिंबा दिला. यावेळी राजेंद्र तुळशीराम आठवले (महाराष्ट्र प्रदेश सचिव), कैलाश जोगदंड (महाराष्ट्र संघटक), प्रियदर्शनी निकाळजे (महाराष्ट्र महिला आघाडी उपाध्यक्ष), विकास साळवे, (पुणे जिल्हा अध्यक्ष), अंकुश चव्हाण (पुणे जिल्हा युवक अध्यक्ष), नितीन पटेकर (अध्यक्ष), लताताई कांबळे, चंद्रकांत ओहळ (मावळ तालुका अध्यक्ष) यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. त्याचबरोबर अखिल भारतीय ओबीसी महासंघ महाराष्ट्र राज्य यांनीदेखील नाना काटे यांना जाहीर पाठिंबा दिला. यासंबंधीचे पत्र त्यांनी काटे यांना दिले.

यावेळी त्यांनी संत निरंकारी सत्संग भवनालाही भेट दिली. ज्योतिबा नगर रोड, रहाटणी येथील नानांच्या कार्यालय येथे शिव पुतळ्याला पुष्पहार अर्पण केले. यावेळी प्रचारप्रमुख भाऊसाहेब भोईर, सायली किरण नढे , विनोद नढे, शिवाजी काळे, संतोष कोकणे, विजय सुतार , पोपट नढे, गणेश काळे , संतोष काटे , चेतन काटे, तन्वीर तांबोळी, विशाल दिलीप नढे आदी उपस्थित होते.

## संपादकीय »

# कोंडलेली शहरे

***राज्यातील ४५ टक्के जनता नागरी वस्तीत राहते. तथापि, शहरांचा विस्तार नियोजनबद्ध न झाल्याने ती सूज आल्यासारखी झाली आहेत. यावर व्यापक उपाययोजना करावी लागेल.***

चकचकीत-गुळगुळीत रस्ते, सुसाटणारी वाहने, गगनचुंबी इमारती, औद्योगिकरणाचा वेग ही विकासाची प्रतीके मानली जातात. तेच सुधारणांचे मापदंड गृहित धरून प्रगतीची मानके ठरवली जातात. डच कंपनी 'टॉम टॉमने वाहतूक कोंडीबाबतचा आपला वाहतूक कोंडी निर्देशांक नुकताच जाहीर करून विकासाच्या सध्याच्या प्रतिमानातील एक काजळकोपरा दाखवून दिला आहे. ५६ देशातील ३८९ शहरातील वाहतूक कोंडी, तिला तोंड देत असताना होणारा वेळेचा व इंधनाचा अपव्यय, परिणामस्वरुप वाट्याला येणाऱ्या मनस्तापासह खिशाला बसणारी झळ, होणारे प्रदूषण, त्याचे परिणाम यांच्याकडे अहवालाने निर्देश केला आहे.

निर्देशांकात लंडन अव्वलस्थानी असून, त्याखालोखाल देशातील बंगळूर दुसऱ्या, पुणे सहाव्या, दिल्ली चौतीस तर मुंबई ४७ व्या स्थानावर आहे. लंडनमध्ये दहा किलोमीटर अंतर कापण्यासाठी ३६.२० मिनिटे लागतात, बंगळूरमध्ये २९.१०, पुण्यात २७.२०, दिल्लीत २२.१० आणि मुंबईत २१.१० मिनिटे लागतात. एकूणात सर्वेक्षणातील सर्वच शहरात प्रवासाच्या वेळेत ६२ टक्के वाढ झाली असून, इंधनावरील खर्चाही वर्षभरात सरासरी तीस टक्क्यांनी वाढलेला दिसत आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहतूककोंडीमुळे हवेत कार्बन डायऑक्साईडसह घातक वायू मिसळण्याचे प्रमाण वाढले आहे.

वर्षाला दररोजच्या दरदहा किलोमीटर प्रवासामागे प्रत्येक वाहन काहीशे किलो कार्बन डायऑक्साईड हवेत सोडते. बंगळूरमध्ये हे प्रमाण एक हजार किलो प्रतिवर्ष असून, यातील २७५ किलो केवळ वाहतूककोंडीत अडकल्याने आहेत. एका आकडेवारीनुसार, देशातील दिल्ली, मुंबई, कोलकत्ता, बंगळूर या शहरातील वाहतूककोंडीची १.४७ लाख कोटी रुपये एवढी प्रचंड किंमत मोजावी लागत आहे. रस्ते अपघातात सव्वा लाखांवर भारतीयांची जीवनयात्रा खंडित होते. जगभरातच नागरीकरणाचा झपाटा खूप मोठा आहे. महाराष्ट्रातली ४५ टक्के जनता नागरी वस्तीत राहते. तथापि, शहरांचा विस्तार नियोजनबद्ध न झाल्याने ती फुगलेली आहेत.महानगरे आणि मोठी शहरे तर आरोग्य, शिक्षण, सांडपाणी व कचरा व्यवस्थापन, वाहतूक यांच्यासारख्या मूलभूत सुविधांवर आलेल्या असह्य ताणांमुळे त्रस्त आहेत. त्यांना बकालपणा आला आहेच; पण नागरी सुविधांवरील ताणामुळे ती अनेकार्थाने आधुनिक कोंडवाडाच बनली आहेत.वाहतूककोंडी ही सगळ्यात मोठी समस्या आहे.

# खनिज इंधनाधारित विकासप्रणालीचे महाधोके वेळीच ओळखायला हवेत...




इंधन या मुद्द्यावर आपल्याकडे बराच काळ आणि खूप चर्चा सुरू आहे. 'लोकसत्ता'मध्ये अलीकडेच प्रसिद्ध झालेले 'विरोधाभासाचा कोळसा' हे संपादकीय (१३ फेब्रुवारी) ही चर्चा पुढे नेणारे आहे. या संपादकीय लेखाने भारत व जगातील अव्वल क्रमांकांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले असून त्यावर मात करण्यासाठी दीर्घकालीन ऊर्जा धोरणाची गरज आकडेवारीसह अधोरेखित केली आहे. नैसर्गिक संसाधने (जमीन, पाणी, जैवसंहिता), श्रमशक्ती, कौशल्य व तंत्रज्ञान हे मानवाचे भरणपोषण, सुखसमाधान, समृद्धीसाठी आवश्यक पायाभूत घटक असून कालौघात त्याची वाढवृद्धी व विकास होत समाज व संस्कृती विस्तारल्या. ४६० कोटी वर्षे आयुर्मान असलेली आपली पृथ्वी अनेक स्थित्यंतरातून अद्भुत वसुंधरा तयार झाली. ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साह्याने नानाविध वस्तू व सेवासुविधांचे निर्माण, आविष्कार होत मानवी जीवन अधिकाधिक सुखावह, संपन्न होत राहिले. या प्रक्रियेत जीवाश्म अगर खनिज (कोळसा, तेल, वायू) इंधनाने मानवाला अचाट वेग दिला. अवघे विश्व 'ग्राम' बनले !मात्र, औद्योगिक क्रांतीनंतरच्या उण्यापुऱ्या तीन शतकांत आधी कोळसा व नंतर तेल आणि वायू यांच्या अफाट वापराने तापमान वाढीची समस्या निर्माण केली. याचे भयावह संचयी व चक्राकार दुष्परिणाम (भूस्खलन, हिमनद्या वितळणे, समुद्र पातळी वाढ, वणवे, उष्ण व शीतलहरी, जैवविविधतेचा ऱ्हास) आज अत्यंत उग्र व व्यापक रूप धारण करत असून मानवाच्या व पृथ्वीच्या सुरक्षेला हा एक महाधोका आहे. किंबहुना ही तापमानवाढ सत्वर रोखली नाही तर मानवाचे अस्तित्वच संकटात आहे. आयपीसीसीच्या अहवालांद्वारे जगभरच्या वैज्ञानिक व समाजधुरीणांनी जो निर्वाणीचा इशारा जगाला दिला आहे, त्याकडे क्षणभरही दुर्लक्ष करणे आत्मघातकी आहे. हे ढळढळीत सत्य आज प्रकर्षाने जाणवत आहे. अर्थात याचे मूळ कारण कोळसा, तेल व इतर खनिज इंधने आहे. मानवासह समस्त जीवसृष्टीवर ओढवलेल्या या हवामान अरिष्टास हे खनिज इंधन जबाबदार आहे, ही



बाब वादातीत... तर प्रश्न आहे: किती काळ आपण याकडे पाठ फिरवणार? भारत हा आज जगातील तिसऱ्या क्रमांकाचा कार्बन उत्सर्जन करणारा देश आहे. जगातील सर्वात मोठी लोकसंख्या व वाढवृद्धीदर (ग्रोथरेट) यामुळे ज्या वेगाने आपला कोळसा, तेल व वायू वापर वाढत आहे, त्यामुळे आर्थिक व पर्यावरणीय दुहेरी दुष्परिणाम होत आहे. सध्या १२ ते १५ लाख कोटी रुपये आपण कच्चेतेल व कोळसा आयातीवर दरवर्षी खर्च करतो. याची खरोखरीच व्यापक लोकहितासाठी गरज आहे का? महामार्ग, मोटारवाहनांची बेसुमार वाढ, सिमेंट, पोलाद, काच व तत्सम अत्यंत मोठ्या प्रमाणावर वीज लागणाऱ्या वस्तू, वाहने व सेवांचे उत्पादन कशासाठी, कुणासाठी केले जात आहे ? खासगी अथवा व्यक्तिगत वापराच्या मोटारवाहनांच्या वापराचा एवढा अट्टहास कशासाठी? संपादकीयात म्हटल्याप्रमाणे कोळशाचे उत्पादन शंभर कोटी (एक अब्ज) टनावर जाणे खरोखरीच अत्यंत प्रदूषणकारी आहे. सोबतच दरवर्षी २५ कोटी लोकांनी विमान प्रवास करणे, अमेरिका-युरोपप्रमाणे प्रत्येक भारतीय व्यक्तीकडे मोटारवाहन, एसी व तत्सम उपकरणे वापर सर्रास झाल्यास त्याचे पर्यावरणावर किती अनाठायी, भीषण परिणाम होतील हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मुख्य म्हणजे इलेक्ट्रिक वाहने हा खचितच पर्याय नाही. या संदर्भात एक बाब आवर्जून लक्षात घ्यावयास हवी की पश्चिमात्य जीवनशैलीचे व विकासप्रणालीचे जे अंधानुकरण आम्ही करत आहोत व एवढे सर्व धोके दिसत असताना तेच विकास प्रारूप अट्टहासाने रेटू इच्छितो ते खचितच वांछित नाही. याचा अर्थ कदापी असा नव्हे की जे वंचित, उपेक्षित आहेत (प्राथमिक सेवा सुविधांपासून) त्यांना तसेच राहू द्यावे. उलटपक्षी, भारतातील नैसर्गिक व मानव संसाधने याचा मेळ घालून पर्यायी ऊर्जास्रोतांचा विकास करणे सहज शक्य आहे. सुदैवाने ते आर्थिकदृष्ट्या देखील परवडणारे (स्वस्त) सुरक्षित व जलदगतीने अमलात येऊ शकणारे आहे. मात्र आपले आजीमाजी धोरणकर्ते राज्यकर्ते व्यक्तिगत मोटारवाहनाचे (उद्योग व व्यापाराचे) इतके कट्टर पुरस्कर्ते आहेत की ते इथेनॉलसारखा दिवाळखोर पर्याय हिरिरीने सुचवत आहेत. थोडक्यात, विकासाचे हे मोदी-गडकरी-फडणवीस प्रारूप सामाजिकदृष्ट्या अन्याय,

# भूकंप अंदाजाचे ग्रह-तारे

**तब्बल ४० हजारांहून अधिक नागरिकांचा जीव घेणाऱ्या तुर्की आणि सीरियातील विनाशकारी भूकंपात प्रचंड जीवित आणि वित्तहानी झाली.**

मात्र घटनेच्या तीन दिवसांपूर्वी नेदरलँड येथील संशोधक फ्रँक हूगरबीट्स यांनी या भूकंपाबाबत अंदाज वर्तवला होता. त्यानंतर त्यांनी तुर्की आणि सीरियापाठोपाठ आगामी काळात भारतीय उपखंडाच्या वायव्य भागातही भूकंप होण्याची शक्यता वर्तवली; परंतु भूकंपाचा अंदाज वर्तवण्यासाठी त्यांनी भूगर्भातील हालचालींसह अवकाशातील ग्रहांचा पृथ्वीवर होणाऱ्या परिणामाचा आधार घेतला; परंतु हूगरबीट्स यांच्या संशोधनाबद्दल जगभरातील अनेक शास्त्रज्ञांनी शंका उपस्थित केली.

नेदरलँडमधील सोलार सिस्टिम जिओमेट्री सर्व्हे (एसएसजीईओएस) येथील संशोधक फ्रँक हूगरबीट्स यांनी ३ फेब्रुवारीला तुर्की, जॉर्डन, सीरिया, लेबनॉन आदी परिसरात सुमारे ७.५ रिश्टर स्केल क्षमतेचा भूकंप होण्याची शक्यता वर्तवली होती. त्यानंतर अवघ्या तीन दिवसांतच तुर्की आणि लेबनॉन परिसरात आलेल्या ७.८ रिश्टर स्केल क्षमतेच्या विनाशकारी भूकंपाने हजारो निष्पाप नागरिकांचा



साखरझोपेतच मृत्यू झाला. ऐन पहाटेच्या वेळी भूकंप आल्याने सुरक्षितस्थळी जाता आले नाही, त्यामुळे तुलनेने मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली. तुर्कीतील भूकंपाचा अंदाज वर्तवताना फ्रँक हूगरबीट्स यांनी आतापर्यंत जगभरात आलेल्या भूकंपाचा अभ्यास आणि त्या वेळी असलेली अवकाशातील ग्रहांच्या परिस्थितीचा कितपत परिणाम झाला, या माहितीचा आधार घेतल्याचे म्हटले.

हा अंदाज वर्तवताना तुर्की, जॉर्डन, सीरिया, लेबनॉन आदी परिसरातील भूगर्भामध्ये काही हालचाली होत असल्याचेही त्यांच्या निदर्शनास आल्याचे हूगरबीट्स म्हणाले. दुर्दैवाने त्यांचा अंदाज खरा ठरला; परंतु अवघ्या तीन दिवसातच हा भूकंप येईल, असे मलाही वाटले नव्हते, असेही ते म्हणाले. त्यानंतर हूगरबीट्स यांनी आगामी काळात भारत-पाकिस्तानसह अफगाणिस्तानचा काही भाग, हिंदी महासागराच्या परिसरात भूकंपाची शक्यताही व्यक्त केली; परंतु ग्रहांच्या परिस्थितीवरून भूकंपाचा अंदाज वर्तवणारी यंत्रणा अद्याप तरी विकसित झाली नसल्याचे जगभरातील शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. पाकिस्तानच्याही हवामान विभागानेही भारतीय उपखंडातील भूकंपाबाबत हूगरबीट्स यांनी व्यक्त केलेली शक्यता फेटाळून लावली आहे. भारतातील संशोधकांनीही या शक्यतेबाबत सहमत नसल्याचे म्हटले आहे.पाकिस्तानलगतच्या भारताच्या वायव्य भागात सातत्याने भूगर्भ हालचाली सुरू असतात. ४-५ रिश्टर स्केल क्षमतेचे छोटे-मोठे भूकंप या परिसरात नियमित होत असल्याने त्यात काही आश्चर्य नसल्याचे वैज्ञानिकांचे म्हणणे आहे.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# “किवळे, मामुर्डी, रावेतमध्ये भाजप जोमात!

## अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा पदयात्रेद्वारे “डोअर टू डोअर” प्रचार

।पिंपरी महाईन्यूज।

**दिवंगत भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघात विकासकामांचा डोंगर उभा केला आहे. शहराच्या इतर भागापेक्षा चिंचवड मतदारसंघात झालेला विकास भाजप आणि आमदार लक्ष्मण जगताप यांचे व्हिजन सांगणारे आहे. आता त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप या मतदारसंघाच्या विकासाला आणखी गती देतील. त्या एक सक्षम महिला आहेत. त्यामुळे अश्विनी लक्ष्मण जगताप यांना निवडून देण्याचा निर्धार किवळे व रावेत परिसरातील ग्रामस्थ व नागरिकांनी रविवारी (दि.१९) केला.**



चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी रविवारी सकाळी किवळेगाव, साळुंखे वस्ती येथील बुद्धविहारात गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणी नतमस्तक होऊन पदयात्रेला सुरूवात केली. त्यांनी बापदेव महाराज मंदिर, भैरवनाथ मंदिरात दर्शन घेतले. यावेळी आमदार उमा खापरे, प्राधिकरणाची माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर आर.एस. कुमार, माजी नगरसेवक बाळासाहेब तरस, बाळासाहेब ओव्हाळ, आप्पा बागल, माजी नगरसेविका संगीता भोंडवे, माजी सरपंच सुदामराव तरस, शिवसेनेचे शहरप्रमुख निलेश तरस, राजेंद्र तरस, गोरख तरस, नवनाथ लोखंडे, अनिल चव्हाण, संदिप काळे, सुधीर तरस, चंद्रकांत तरस, दशरथ साळुंखे, सुधीर साळुंखे, दिपक तरस, नितीन कुऱ्हाडे, हंबीरराव आवटे, भाजपचे नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या भगिनी साठे, मोहनराव कदम, आरपीआयचे दिलीप कडलक, गौतम गायकवाड, शिवशरण, अलका पांडे, सुनीता चांदणे, दिलीप राऊत, सचिन राऊत, नवनाथ राऊत, लतिका ओव्हाळ, शुभांगी वानखेडे, निता चव्हाण, गणेश झेंडे, नवनाथ जांभुळकर, संजय तापकीर आदी उपस्थित होते.

अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी किवळे, मामुर्डी आणि रावेतमध्ये घरोघरी जाऊन नागरिकांशी संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेच्या आशिर्वादाने देशाला महासत्ता बनवण्यासाठी जोरदार पावले टाकली आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक क्षेत्रात देशाची प्रगती होत आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनीही चिंचवड मतदारसंघाची ओळख विकासकामांचा मतदारसंघ म्हणून निर्माण केली आहे. राज्यात भाजप-शिवसेना युतीचे सरकार असताना पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग झाला. त्याचा फायदा किवळे आणि रावेत भागातील नागरिकांना होत आहे.

### “कमळ” हे चिन्ह विकासाचे प्रतिक

**दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि भाजपने केलेली विकासकामे जनतेच्या डोळ्यासमोर असून “कमळ” हे चिन्ह विकासाचे प्रतिक असल्याचे अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी नागरिकांना सांगितले. चिंचवड विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत झालेल्या विकासकामांमुळे जनतेचा प्रवास व जगणे सुसह्य झाले आहे. विकासाचा हा रथ असाच दौडत ठेवण्यासाठी पोटनिवडणुकीत भाजपचा विजय होणे महत्त्वाचे असल्याचे अश्विनी लक्ष्मण जगताप म्हणाल्या. येत्या २६ तारखेला कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून विकासाची नाळ घट्ट करावी, असे आवाहन अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी नागरिकांना केले.**

# विकास कामांच्या बळावर विजयी होणार : राहुल कलाटे

## शेळके यांच्याकडून राजकारणाचे धडे घेण्याची गरज नाही

।मुंबई। महाईन्यूज।

**आमदार सुनील शेळके स्वतः भाजप मध्ये पदाधिकारी होते ते आमदार होण्यासाठी राष्ट्रवादीत आले. त्यामुळे त्यांच्याकडून राजकारणाचे धडे घेण्याची गरज नाही. त्यांनी आम्हाला अक्कल शिकवू नये. असा इशारा चिंचवड मतदार संघातील अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांनी दिला आहे. मी स्वतः चिंचवड मतदार संघाच्या विकासासाठी कामे केली आहेत विविध प्रश्नांवर आंदोलने ही केली आहेत त्याच बळावर मी जनतेच्या आशीर्वादाने मी ही निवडणूक लढवत आहे चिंचवडची सुज्ञ जनता निश्चितपणे माझ्यामागे उभी राहील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.**



काल पिंपळे निलख येथे महाविकास आघाडीच्या प्रचारार्थ आयोजित सभेत आमदार सुनील शेळके यांनी कलाटे यांच्या संदर्भात वक्तव्य केले होते. कलाटे यांना आम्ही येत्या 2024 मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मावळ मतदारसंघातून तिकिटाची ऑफर दिली ती त्यांनी नाकारली मग आम्ही पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून अनिल भोसले यांच्या जागी विधानपरिषद निवडणूक लढविण्याची ही ऑफर दिली. मात्र तीही ऑफर त्यांनी नाकारली कारण त्यांना चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक लढवायचीच होती त्यांचा बोलावता धनी दुसराच आहे योग्य वेळी आम्ही सांगू असे शेळके यांनी म्हटले होते. त्याला चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांनी सणसणीत उत्तर दिले आहे.

कलाटे यांनी म्हटले आहे की, वाकड परिसरात लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना मी अनेक विकास कामे केली आहेत. त्यामधील शंभर कोटीची विकास कामे मंजुरीसाठी असताना दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी स्थायी समिती अध्यक्ष सांगून ती कामे स्थायी समितीत रोखली त्याबाबत मी राज्य शासनाकडे पाठपुरावा करून नगर विकास विभागामार्फत ही कामे जनतेच्या विकासासाठी मार्गी लावली. अनेक विकास कामांसाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. दि.24 मार्च 2021 रोजी मुंबई – बेंगलोर रस्त्यावर ताथवडे व पुनावळे येथे नविन सब-वे, भूमकर चौक, वाकड येथे नविन सब- वे साठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना साकडे घातले.

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील मुंबई – बेंगलोर रस्त्यावर ताथवडे व पुनावळे येथे नविन सब-वे करणे, भूमकर चौक, वाकड येथे नविन सब- वे करणे व महापालिका हद्दीतील वाकड ते रावेत किवळे सर्व्हिस रस्ता विकसीत करणे कामी पिंपरी चिंचवड महापालिकेकडे हस्तांतरीत करणे बाबत केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना दिल्लीत निवेदन दिले.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीमधील ताथवडे येथून जाणा-या मुंबई-बंगळुरु रस्त्यालगत 60 मीटर रस्त्याच्या दोन्ही बाजूने 12 मीटर सर्व्हिस रस्ता प्रस्तावित करण्याबाबतच्या प्रस्तावाला मान्यता द्यावी. सांगवी ते किवळे बीआरटी मार्गावरील ताथवडे पुनावळे हद्दीपासून पुनावळे रावेत पुलापर्यंत आणि रावेत गावठाणापासून किवळे हद्दीतील मुकाई चौकापर्यंत मंजुर विकास योजनेत असलेली 30 मीटर रस्ता रुंदी 45 मीटर करण्यासाठीच्या फेरबदलास मान्यता देण्याची मागणी 9 एप्रिल 2022 रोजी राज्य सरकारकडे केली.

### आम्हाला अक्कल शिकवू नये

**याबाबत तत्कालीन नगरविकास, सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथजी शिंदे यांची भेट घेतली. त्यांना मागणीचे निवेदन दिले. त्यावर शिंदे यांनी तत्काळ प्रस्ताव सादर करण्याचे आदेश विभागाच्या प्रधानसचिवांना दिले. शिवसेनेचे संपर्कप्रमुख माजी मंत्री सचिनभाऊ अहिर हेही त्यावेळी उपस्थित होते. विविध विकास कामे मार्गे लावल्याने चिंचवड मतदार संघातील लोकांच्या कामासाठी मी तत्पर राहणारा लोकप्रतिनिधी आहे हे जनतेला कळून चुकले आणि मीही ते सिद्ध केले त्यामुळे चिंचवड मतदार संघाबाहेरील सुनील शेळके यांनी इथे येऊन आम्हाला अक्कल शिकवू नये असा इशारा कलाटे यांनी दिला आहे.**

# “भारतामुळे अमेरिकेसह यूके आणि फ्रान्समध्ये रोजगार निर्माण होईल,”

» रविशंकर प्रसाद यांचं वक्तव्य!

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी शनिवारी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीबाबत मोठं विधान केलं आहे. देशातील सर्व विरोधी पक्ष एकत्र आल्यास भाजपाला १०० जागांवरही विजय मिळवता येणार नाही, असं विधान नितीश कुमारांनी केलं. त्यांच्या या विधानानंतर भाजपाकडून जोरदार टीका केली जात आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांनी नितीश कुमारांवर निशाणा साधताना मोदी सरकारच्या आर्थिक धोरणाचं कौतुक केलं.**






भारत देश बदलला असून भारतामुळे अमेरिकेसह यूके आणि फ्रान्समध्ये रोजगार निर्मिती होईल, असं विधान रविशंकर प्रसाद यांनी संबंधित देशांच्या पंतप्रधानांच्या हवाल्याने केलं.

नितीश कुमार यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना भाजपाचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद म्हणाले की, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांना काय झालं आहे? ते बिहार राज्य व्यवस्थित हाताळू शकत नाहीत. त्यांचं राज्य संकटात आहे. त्यांच्या पक्षात अराजकता माजली आहे.

काँग्रेस पक्षही त्यांना सामावून घेत नाही. त्यांना देवेगौडा किंवा इंदरकुमार गुजराल यांच्यासारखं ५-६ महिन्यांसाठी पंतप्रधान बनायचं आहे का? असा सवाल प्रसाद यांनी विचारला.

### नितीश कुमार नेमकं काय म्हणाले होते?

**»बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार शनिवारी म्हणाले की, काँग्रेसने आता विश्रांती घेऊ नये. राहुल गांधींच्या ‘भारत जोडो यात्रे’ने नवीन ऊर्जा निर्माण केली आहे. या गतीचा उपयोग भाजपाच्या विरोधातील पक्षांची युती करण्यासाठी केला पाहिजे. हे काम लवकरात लवकर झालं पाहिजे. ज्यामुळे लोकसभेत ३०० पेक्षा अधिक जागांसह प्रचंड बहुमत असलेल्या भाजपाला सत्तेतून हटवता येईल. तसेच पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला १०० पेक्षा कमी जागांवर आपल्याला रोखता येईल.**

रविशंकर प्रसाद पुढे म्हणाले, “नितीश कुमार असो वा इतर कोणताही नेता, त्यांना हे समजत नाही की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताचा विकास वेगाने होत आहे.

भारत जगातील सर्वात मोठी पाचवी अर्थव्यवस्था बनली आहे. यूके, अमेरिका आणि फ्रान्सच्या पंतप्रधानांनी भारताच्या एअर इंडिया कराराचं कौतुक केलं आहे.

भारताच्या या करारामुळे त्यांच्या देशांत रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असं त्यांचं म्हणणं आहे. आता आपला देश खूप बदलला आहे.”

# निवडणुकीपूर्वी सापडले तब्बल 80 बॉम्ब

## परिसरात उडाली खळबळ, जिल्हा पोलिसही चक्रावले

।बीरभूम । महाईन्यूज ।

पश्चिम बंगालमध्ये पंचायत निवडणुकीपूर्वी बीरभूम जिल्ह्यात स्फोटकं आणि बॉम्बमिळण्याची प्रक्रिया सुरू आहे.

आता एकाच वेळी 80 बॉम्ब मिळाल्यामुळं संपूर्ण परिसरात खळबळ उडालीये. हे बॉम्ब ड्रममध्ये भरून ठेवण्यात आले होते. शनिवारी रात्री पोलिसांनी सदायपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध भागात छापेमारी केली.

रात्रीच्या या कारवाईत 5 ड्रम बॉम्ब सापडले. या ड्रममध्ये ठेवलेले एकूण 80 बॉम्ब सीआयडीच्या बॉम्बशोधक पथकानंरविवारी सकाळी निकामी केले. एका दिवसात 80 बॉम्ब मिळाल्यामुळं जिल्हा पोलिसही चक्रावले आहेत.

**शोध मोहीम तीव्र**

पोलिसांनी जिल्ह्यात शोधमोहीम तीव्र केलीये. शनिवारी रात्री झडतीदरम्यान पोलिसांनी सदायपूर पोलीस ठाण्याच्या पाच भागांतून किमान 80 बॉम्ब जप्त केले. हे बॉम्ब कोणी पेरले आणि त्यांचा उद्देश काय होता, याचा शोध पोलीस घेत आहेत.



### पोलीस अलर्ट मोडवर..

**» दरम्यान, जुन्या गुन्हेगारांची धरपकडही तीव्र करण्यात आलीये. यासोबतच अवैध बॉम्ब आणि शस्त्रास्त्रांचीही शोध सुरू आहे. जिल्ह्यातील गुन्हेगारी व गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांकडून रूट मार्च आणि सर्च ऑपरेशन राबवलं जात असल्याचं जिल्हा पोलिस अधीक्षकांनी सांगितलं.**

### जिल्हाभर पोलिसांचा रूट मार्च

**» 4 फेब्रुवारीला माडग्राममध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात तृणमूलचे दोन कार्यकर्ते ठार झाले होते. यानंतर बीरभूमचे एसपी नागेंद्र नाथ त्रिपाठी यांना त्यांच्या पदावरून हटवण्यात आलं. त्यांच्या जागी जिल्ह्यातील भास्कर मुखर्जी यांना बीरभूमचे पोलीस अधीक्षक करण्यात आलं. पदभार स्वीकारताच त्यांनी जिल्हाभर पोलिसांचा रूट मार्च सुरू केलाय.**

# निवडणुकीपूर्वीच भाजपला मोठा धक्का

## लिंगायत नेत्याचा काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

।चिक्कमंगळुरु। महाईन्यूज ।

: कर्नाटक विधानसभेची निवडणूक जशी जवळ येत आहे, तसे बडे नेते पक्षांतर करताना दिसत आहेत. दरम्यान, भाजपचे (BJP) राष्ट्रीय सरचिटणीस सीटी रवी यांना घरातच मोठा धक्का बसलाय.चिक्कमंगळुरूमधील लिंगायत नेते , माजी मुख्यमंत्री बीएस यडियुरप्पांचे सहकारी आणि भाजपचे समन्वयक एचडी थिमय्या यांनी भाजपला अलविदा करत अधिकृतपणे काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

आज (19 फेब्रुवारी) बेंगळुरू येथील केपीसीसी कार्यालयात (KPCC OFFICE) एचडी थिमय्या यांनी केपीसीसी अध्यक्ष डीके शिवकुमार यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. थिमय्या हे चिक्कमंगळुरू मतदारसंघातील लिंगायत समाजाचे नेते आहेत.

थिमय्यांच्या प्रवेशामुळं काँग्रेसचं पारड जड झालं असून या मतदारसंघात भाजपला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. चिक्कमंगळुरुमध्ये 15 हजार वोक्कलिगा आणि 40 हजारांहून अधिक लिंगायत समाजाची मतं आहेत. मात्र, आता थिमय्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतल्यामुळं भाजपची लिंगायत मतं फुटण्याची शक्यता आहे.

सीटी रवी हे गेल्या 20 वर्षात कफिनाड चिक्कमंगळुरुचे 4 वेळा आमदार राहिले आहेत. मात्र, आता त्यांच्याच पक्षाचे माजी नेते विरोधक झाले आहेत. एच.डी थिमय्यांनी यंदा भाजप जिल्हाध्यक्षांकडं तिकीट देण्याची विनंती केली होती. मात्र, त्यांनी तिकीट देण्यास नाकार दिला, त्यामुळं त्यांनी काँग्रेस प्रवेशाचा मार्ग पत्करला आहे.



### भाजपची लिंगायत मतं फुटण्याची शक्यता

**» थिमय्यांच्या प्रवेशामुळं काँग्रेसचं पारड जड झालं असून या मतदारसंघात भाजपला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. चिक्कमंगळुरुमध्ये 15 हजार वोक्कलिगा आणि 40 हजारांहून अधिक लिंगायत समाजाची मतं आहेत. मात्र, आता थिमय्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतल्यामुळं भाजपची लिंगायत मतं फुटण्याची शक्यता आहे.**

# इंडस्ट्रीत काम मिळेना..शमिता शेट्टी

कधी-कधी प्रतिभा असूनही कलाकारांना काम सहजासहजी मिळत नाही. असाच काहीसा प्रकार अभिनेत्री शमिता शेट्टीसोबत घडला आहे. अनेकवेळा चांगल्या प्रोजेक्टसाठी तिला दोन-तीन वर्षे वाट पाहावी लागली. नुकतीच शमिता 'द टेनंट' चित्रपटात दिसली आहे.

लोक याला शमिताची दुसरी इनिंग म्हणत आहेत. तिचाही असा विश्वास आहे का? यावर शमिता म्हणते, 'माझा यावर विश्वास नाही. प्रत्येक वेळी माझा एखादा चित्रपट प्रदर्शित झाला की लोक माझ्याबद्दल असेच बोलतात. मी किती वेळा परत येईन. माझ्या चित्रपटांच्या प्रदर्शनात अंतर आहे कारण चांगल्या ऑफर्स आल्या नाहीत. का आल्या नाहीत हे मला माहीत नाही, जे पण येत होतं, त्यातून सर्वोत्तम निवडून मी काम करत होते.

शमिताने कारण शोधण्याचा प्रयत्न केला नाही का? यावर ती म्हणते, "अर्थात मी प्रयत्न केला. मी माणूस आहे, मलाही वाटायचं की असं का होतंय. मी बराच काळ उदास होते. मी कठीण काळातून गेले आहे, ळ असते. कदाचित हीच माझी योग्य वेळ असेल आता चांगले विषय माझ्याकडे येत आहेत.

मला आशा आहे की या युगात जिथे खूप काम आहे, मला पुढच्यापण हे असेच लिहिले होते.कदाचित त्या संघर्षमय दिवसांमुळेच मी आज इतकी खंबीर आहे. प्रत्येक अनुभवासाठी मी तुमची आभारी आहे. प्रत्येक गोष्टीची एक वे प्रोजेक्टसाठी जास्त वाट पाहावी लागणार नाही".अलीकडे इंटरनेट मीडियावर शमिता रिलेशनशिपमध्ये असल्याची बरीच चर्चा झाली होती. यावर शमिता म्हणाली, "हो, मला नक्कीच लोक जज करतात. जर तुम्ही माझ्या इंटरनेट मीडिया पेजवर गेलात तर तुम्हाला दिसेल की लोकांनी मला किती वेळा जज केले आहे. तू लग्न का करत नाहीस, लग्नाचे वय गाठले आहेस, म्हातारी होत आहेस, तुला कोणी भेटत नाही का, असे लोक लिहितात.

कधी कधी असे वाटते की माझा जन्म फक्त लग्न



# एसएस राजामौलींचं कौतुक करत कंगना नेटकऱ्यांवर भडकली



बॉलिवूड अभिनेत्री कंगनाने सोशल मीडियावर कमबॅक केले आहे. ती जवळजवळ प्रत्येक मुद्द्यावर बोलत असते आणि तिचे विधान ती अगदी स्पष्टपणे मांडते. अभिनेत्रीने नुकतीच सोशल मीडियावर उद्धव ठाकरेंवर निशाणा साधत एक पोस्ट लिहिली आहे. तिच्या या पोस्टला चाहते सहमती देताना दिसले.

याशिवाय, अलीकडेच, एका वापरकर्त्याच्या पोस्टवर टिप्पणी करताना, अभिनेत्रीने एसएस राजामौली यांचा बचाव केला आणि त्यांचे कौतुकही केले. अभिनेत्रीचे हे ट्विट सोशल मीडियावर व्हायरल होत असून चाहते त्यावर प्रतिक्रिया देत आहेत.

खरं तर, ट्विटरवर पोस्ट करताना एका यूजरने दक्षिण भारतीय चित्रपट निर्माते एसएस राजामौली यांच्यावर निशाणा साधला आणि लिहिले की- ‘द फाउंटनहेड’ या कादंबरीपासून प्रेरित होऊन एसएस राजामौली म्हणाले की, धर्म हा फसवणुकीसारखा आहे.

यासोबतच युजरने सर्वांना एसएस राजामौली यांचा व्हिडिओही आणि भाषण ऐकण्यास सांगितले. जेव्हा या ट्विटर कंगनाची नजर पडली तेव्हा ती स्वतःला रोखू शकली नाही. तिने आपल्या वक्तव्यात राजामौलींचा बचाव केला.

# शाहरुखच्या या सिनेमात स्टुडिओतलं शूटिंग नावालाच



शाहरुख खान,दीपिका पदूकोण आणि जॉन अब्राहम अभिनित 'पठाण' सिनेमानं बॉक्स ऑफिसवर सलग तिसऱ्या आठवड्यातही आपला दबदबा कायम ठेवला आहे. हा सिनेमा शाहरुख खानच्या चाहत्यांसाठी जणू जंगी मेजवानी आहे असं म्हणावं लागले. आता चाहत्यांना प्रतिक्षा आहे ते किंग खानच्या 'जवान' सिनेमाची. नुकत्याच समोर आलेल्या माहितीनुसार शाहरुख खाननं 'जवान' सिनेमाचं १३० दिवसांचं पहिल्या शेड्युलमधलं शूटिंग पूर्ण केलं आहे. आणखी ३० दिवसाचं उरलेलं शूटिंग लवकरच पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.एका सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार,'पठाण' एक ॲक्शन सिनेमा होता..पण 'जवान'ची गोष्ट थोडी वेगळी आहे...त्याच्या गरजा थोड्या वेगळ्या होत्या..आहेत.. त्यामुळे जवानचं जवळपास ९० टक्के शूट हे रिअल लोकेशनवर करण्यात आलंय..येतंय.साऊथचा ब्लॉकबस्टर दिग्दर्शक एटलीनं ॲक्शन डायरेक्टर सुनिल रेड्रिग्स आणि एएनएल यांच्या सहाय्यानं सिनेमातील ॲक्शन सीन्स मोठ्या व्यापक स्तरावर शूट केलेयत. मोठ्या पडद्यावर ज्या आकर्षक गोष्टी पाहण्याची हौस प्रत्येक प्रेक्षकाला असते त्याहून अधिक मोठ्या स्तरावर काहीतरी लोकांना पहायला मिळेल आणि सिनेमाकडून त्यांची जी मागणी असते ती पूर्ण होईल असं देखील सूत्रांचे म्हणणे आहे.

'जवान' एकदम आपला सिनेमा लोकांना वाटेल आणि भरभरून त्यांचे मनोरंजन करेल असा विश्वासही त्या सूत्रानं व्यक्त केला आहे.

# लग्नासाठी होकार द्यायला हंसिका मोटवानीने घेतली ‘इतकी’ वर्ष

अभिनेत्री हंसिका मोटवानी हिने बालकलाकार म्हणून मनोरंजन सृष्टीत पदार्पण केलं आणि तिला प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळालं. ‘शाका लाका बूम बूम’ या मालिकेत ती करुणा ही व्यक्तिरेखा साकारताना दिसली. त्याचप्रमाणे हृतिक रोशनच्या ‘कोई मिल गया’ या चित्रपटातही ती झळकली. पण २००७ साली तिला हिमेश रेशमियाच्या ‘आप का सुरूर’मध्ये पाहून प्रेक्षक आश्चर्यचकीत झाले. ४ डिसेंबर रोजी हंसिकाने बॉयफ्रेंड सोहेल खातुरियाशी लग्नगाठ बांधली आहे. नुकतेच तिने एका मुलाखतीत खासगी आयुष्यावर भाष्य केले आहे.

राजस्थानमधील जयपूर शहरातील एका किल्ल्यात हंसिकाचा शाही विवाह सोहळा पार पडला. लग्नानंतर दोघे खुश आहेत. इंडिया टुडेशी बोलताना ती असं म्हणाली, “एखाद्याला होकार द्यायला मला किमान ७ ते ८ वर्ष लागली. माझा प्रेमावर विश्वास आहे. मी एक रोमँटिक व्यक्ती आहे पण मला ते दाखवता येत नाही. मी विवाह संस्थेवर आणि लग्नावर विश्वास ठेवते.” ती पुढे म्हणाली, “खरे सांगायचे तर मी वेळ घेतला कारण मी तेव्हाच होकार दिला जिला जेव्हा मला वाटले ती व्यक्ती आता कायमची माझी आहे. सोहेल आला आणि प्रेमावरचा माझा विश्वास असल्याची खात्री केली.



# विराट कोहलीच्या शिरपेचात आणखी मानाचा तुरा

## सचिनला मागे टाकत रचला विश्वविक्रम

। मुंबई। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**सध्या भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात दुसरा कसोटी सामना दिल्लीत खेळला जात आहे. या सामन्यात स्टार फलंदाज विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आणखी एक मोठी कामगिरी केली आहे. त्याने सचिन तेंडुलकरचा विश्वविक्रम मोडला आहे. विराट कोहली आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद २५००० धावा करणारा जगातील पहिला फलंदाज बनला आहे. अशा प्रकारे त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आणखी एक विश्वविक्रम केला आहे.**



विराट कोहलीने दिल्लीच्या मैदानावर सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात ८वी धाव घेताच, तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान २५ हजार धावा करणारा ठरला. विराट कोहलीने सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे. सचिनने ५७७ डावात ही कामगिरी केली होती, तर आता विराट कोहलीने ५४९व्या डावात ही कामगिरी केली. त्याचबरोबर ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉन्टिंग या प्रकरणात तिसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याने ५८८ डावांमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २५००० धावा पूर्ण केल्या. ही कामगिरी करणारा विराट कोहली जगातील सहावा फलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी सचिन तेंडुलकर, कुमार संगकारा, रिकी पॉंटिंग, महेला जयवर्धने आणि जॅक कॅलिस यांनी २५ हजार किंवा त्याहून अधिक धावा केल्या आहेत.

### विराट कोहलीच्या तिन्ही फॉरमॅटमधील धावा

**विराट कोहलीने एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक १२८०९ धावा केल्या आहेत, तर वृत्त लिहिपर्यंत त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ८१९० धावा केल्या आहेत. याशिवाय टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये विराट कोहलीच्या बॅटने ४००८ धावा निघाल्या आहेत. टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा तो जगातील पहिला फलंदाज आहे.**



# सौराष्ट्र संघ पुन्हा ठरला रणजी चॅम्पियन!

## जयदेवच्या नेतृत्वाखाली बंगालचा 9 विकेट्सने उडवला धुव्वा

। बंगाल । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

रणजी ट्रॉफी २०२२-२३चा अंतिम सामना सौराष्ट्र आणि बंगाल संघांमध्ये खेळला गेला. या सामन्यात जयदेव उनाडकटच्या नेतृत्वाखालील सौराष्ट्राने मनोज तिवारीच्या बंगाल संघाचा दारुन पराभव केला. बंगाल संघाला त्यांच्या यजमानपदी खेळल्या गेलेल्या सामन्यात ९ विकेट्सने पराभव पत्करावा लागला.

सौराष्ट्र संघाचा कर्णधार जयदेव उनाडकटने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. बंगालचा संघ पहिल्या डावात ५४.२ षटकात १७४ धावांत गुंडाळल्याने, कर्णधाराचा निर्णय योग्य ठरला. बंगालकडून शाहबाज अहमदने ६९ आणि अभिषेक पोरेलने ५० धावा केल्या. सौराष्ट्रकडून जयदेव उनाडकट आणि चेतन साकारिया यांनी ३-३ बळी घेतले. चिराज जानी आणि डी जडेजा यांना २-२ बळी मिळाले. सौराष्ट्र संघ पहिल्या डावात फलंदाजीसाठी उतरला तेव्हा त्यांना चांगली सुरुवात करता आली नाही. मात्र, ४ फलंदाजांनी अर्धशतके झळकावली, ज्याच्या जोरावर सौराष्ट्र्याच्या संघाने ४०४ धावा केल्या. सौराष्ट्रतर्फे वासवडा याने ८१ धावा, चिराज जानीने ६० धावा, शेल्डन जॅक्सनने ५९ धावा आणि हार्विक देसाईने ५० धावा केल्या. बंगालकडून मुकेश कुमारने ४ तर आकाश दीप आणि ईशान पोरेलने ३-३ बळी घेतले. त्याचवेळी बंगालचा संघ दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी उतरला तेव्हा त्यांना प्रथम २३० धावांची आघाडी गाठावी लागली. प्रत्युत्तरात संघ २४१ धावांत गारद झाला. ज्यामुळे चौथ्या दिवशी सौराष्ट्रला १२ धावांचे लक्ष्य होते, ते सौराष्ट्राने सहज गाठले. जयदेव उनाडकटने दुसऱ्या डावात बंगालचे ६ फलंदाज बाद केले. या सामन्यात सौराष्ट्रने ९ विकेट्सने विजय मिळवला.




### सौराष्ट्रचे दुसरे विजेतेपद

**रणजी ट्रॉफीच्या इतिहासातील सौराष्ट्र संघाचे हे दुसरे विजेतेपद आहे. जयदेव उनाडकटच्या नेतृत्वाखाली सौराष्ट्रच्या संघाने २०१९-२० मध्ये पहिले विजेतेपद पटकावले. गेल्या ११ हंगामांबद्दल बोलायचे झाल्यास, सौराष्ट्र संघाने ५ फायनल सामने खेळले आहेत. त्यापैकी दोन जिंकले आणि तीन गमावले आहेत. गेल्या वर्षीही उपांत्य फेरी गाठण्यात संघाला यश आले होते.**

# हरमनप्रीत कौरने मोडला रोहित शर्माचा मोठा विक्रम

## 'ही' कामगिरी करणारी बनली पहिली खेळाडू



। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने शनिवार, १८ फेब्रुवारी २०२३ रोजी एक इतिहास रचला. हरमनप्रीत कौरने भारताचा सलामीवीर रोहित शर्माचा विश्वविक्रम मोडला आहे. हरमनप्रीत कौर आता टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक सामने खेळणारी क्रिकेटर बनली आहे. या प्रकरणात आता रोहित शर्मा दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. चांगली गोष्ट म्हणजे हे दोन्ही क्रिकेटपटू भारतीय आहेत.

हरमनप्रीत कौर जेव्हा आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२३ च्या गट बी लीग सामन्यात इंग्लंड विरुद्ध खेळण्यासाठी उतरली. तेव्हा तिचा हा १४९ वा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना होता. त्याच वेळी, भारतीय कर्णधार रोहित शर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १४८ सामने खेळले आहेत. या यादीत तिसरे नाव आहे न्यूझीलंडची फलंदाज सुझी बेट्स आहे, जिने आतापर्यंत १४० टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत

ऑस्ट्रेलियाची अष्टपैलू खेळाडू एलिस पॅरीने टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील रोहित शर्माचा विक्रम मोडला आहे. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक सामने खेळण्याच्या बाबतीत एलिस पॅरीने आता रोहितला मागे टाकले आहे.